# राशिभविष्य - जुलै, २०१७.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

===============================================================

**(१) मेष -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे त्यांना जे काय साध्य करावयाचे आहे ते त्यांनी पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. कारण महिन्याचा उत्तरार्ध अधिक प्रमाणात प्रतिकुल असण्याची शक्यता दिसते. शासकीय , निम-शासकीय नोकरदार मंडळीना वरिष्ठाकडून पाठीवर कौतुकाची थाप अनुभवास मिळेल. त्यामुळे काही मंडळीना बढती, एखादे उच्च पद असे काही मिळणेही शक्य दिसते. मात्र पूर्वार्ध वाया घालवलात तर उत्तरार्ध प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी मनस्तापच सहन करावा लागेल. जपा. यांत्रिक तांत्रिक नोकरीव्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते आणि इतर व्यापार-व्यवसाय असणारानाही महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रहाबरोबर रवि ग्रहही प्रतिकुल होणार असल्याने अनारोग्य, कार्यनिराशा, आर्थिक नुकसान, खर्च वाढ, कौटुंबिक वाद, भांडणे, असमाधानकारक घटना घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त कारीलसे दिसते. केवळ बौद्धिक नोकरी-व्यवसाय, कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या युवकांना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. त्यामुळे शैक्षणिक प्रगतीतही बाधा येणे शक्य आहे. जपा. त्यामुळे या राशीच्या मंडळींच्या संततिसुखातही बाधा येणे शक्य आहे. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने शारीरिक अनारोग्याचा फारसा त्रास होणार नाही. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व " ओम गं गणपतये नम:" या मंत्राचा दररोज नियमितपणे जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक-मानसिक अनारोग्याशी मुकाबला करावा लागण्याची दाट शक्यता दिसते. रवि-मंगळ दोन्ही उष्ण ग्रह प्रतिकुल असल्यामुळे
विशेष करून आर्थिक समस्या हा चिंतेचा विषय होईल. आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी काही मंडळीना खूप कष्ट परिश्रम करावे लागतील. काहींना वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. काहींना फसवणुकीमुळे आर्थिक नुकसान झाल्याने असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. काहींचे मालकीचे धन येणे अपेक्षित आहे ते न आल्याने देणे कसे द्यायचे याची चिंता त्रस्त करील. अशामुळे
शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांनी शारीरिक आरोग्यावर परिणाम होणे संभवते. कोणाला डोळ्याची दुखणी त्रस्त करतील; तर काहींना घसा, दाढा, मान यांपैकी कशाचे तरी अनारोग्य त्रस्त करील. त्यात भर म्हणून आप्तेष्ट मंडळीशी वाद, भांडणे होणे संभवते. त्यातून शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. सप्तम स्थानी शत्रुराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे स्वत:चे वा जीवनसाथीचे
अनारोग्य त्रस्त करील. जपा. अशा परिस्थितीत काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. नोकरी-व्यवसायात अनुकुल वातावरण निर्माण

होईल. वरिष्ठ तुमच्या कामाचे कौतुक करतील. काहीना बढती, वेतनवाढ, एखादे मानाचे पद असे काही मिळण्याची शक्यता दिसते. पण या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवे काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. राहूमुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. पण उत्तरार्धात गृहसौख्य लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. अपेक्षित संततिसुख लाभेल. मनोविकार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या संपूर्ण काळात रवि-मंगळ हे उष्ण प्रकृतीचे ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे आपल्या संतापी, हेकट, उद्धट, हट्टी व मानापमान फार असलेल्या स्वभावाला काबूत ठेवून तसेच मन शांत ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केले गेले तर खूपच सुखाचे होईल. नपेक्षा अकारण श्रम, दगदग होऊन शारीरिक पीडा व थकावट सहन करावी लागेल. शिवाय शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. काही मंडळीना डोळ्याची दुखणी त्रस्त करतील; तर काहींना घसा, मान, दाढा यापैकी कसला तरी आजार त्रस्त करील. जपा. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. नियोजित कार्यात अडथळे येणे, पीछेहाट होणे, अर्थप्राप्तीसाठी केलेल्या प्रयत्नात फारसे यश न येणे, आर्थिक फसवणूक किंवा आर्थिक नुकसान होणे संभवते. शिवाय अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण होणार याची चिता त्रस्त करण्याची शक्यता वाटते. त्यात भर म्हणून महिन्याच्या उत्तरार्धात जवळच्या नात्यातील मंडळींशी वाद, भांडणे होऊन बंधुसुखात बाधा येणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळींची स्थावर खरेदी तर काहींची स्थावर विक्रीची कामे मनाप्रमाणे पार पडतील; पण त्याच वेळी नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. हर्षल ग्रहामुळे मित्रांशी भांडण होणे संभवते. विविध कारणानी अपेक्षित संततिसुख मिळण्याची खात्री देता येत नाही. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे व मन:शांती मिळविणे शक्य होईल. तसेच कोळसा , लोखंडी सामान विक्रेत्यांना काळ बारा जाईल. श्रद्धेने श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना केल्यास मन:शक्ती प्राप्त होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ शारीरिक कष्ट-परिश्रम करावयास लावणारा व मानसिक दृष्ट्या असह्य मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. रवि-मंगळ-शनि हे महत्त्वाचे ग्रह मुळीच अनुकुल नसल्याने कौटुंबिक सुखात, नोकरीतील परिस्थितीत चिंता व असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्यता आहे. सतत मनाविरुद्ध घटना घडणे, जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा मनस्ताप सुरू होणे, घरात गैरसमजाने वाद, भांडण होणे, अकारण मानहानी होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे अशा घटना घडून असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. याचा परिणाम म्हणून

जीवनसाथीचे व तुमच्या स्वत:चे आरोग्यावर परिणाम होणे शक्य दिसते. त्यात भर म्हणून संततिविषयक समस्यांची चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. केवळ गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, साहित्यिकांना तसेच राजकारणाशी संबंधित मंडळीना काळ थोडा फार अनुकुल व लाभदायक होईल. पण हाच गुरु ग्रह बंधुसुखास प्रतिकुल असल्याने भावंडाकडून त्रास होणे संभवते. शक्यतो बाहेरचे उघडे पदार्थ खाऊ नका. विष भय आहे. तसेच शक्यतो जलप्रवास वा पोहणे बंद ठेवा. कारण जलभयही आहे. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या केतूमुळे अपघात भय असून हा केतू वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा निर्माण करू शकेल. जपा. काही मंडळीना त्वचा विकाराचा, काहींना रक्तविकाराचा तर काहींना मुखदंत विकाराचा आजार त्रस्त करील. जपा. मन व बुद्धी स्थिर ठेवून अध्ययन करता आले तरच या राशीचे विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करू शकतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व शिवोपासना अनुकुल होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आपल्या मानी, अहंकारी स्वभावावर नियंत्रण ठेवून , सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करूनच काळ व्यतीत करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. तसे आचरण केलेत तरच अपमान होण्याची शक्यता कमी होईल व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. गुरु-शुक्र या ग्रहांच्या शुभ योगामुळे बौद्धिक व कलात्मक नोकरीव्यवसाय असणारांना तसेच वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते यांनाही महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच शासकीय, निम-शासकीय व खाजगी नोकरदार मंडळीनाही महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. पण लाभस्थानी असलेला मंगळ मैत्रीमध्ये वितुष्ट निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यवसाय वाढीस काळ अनुकुल होईल. पण विविध कारणांनी अपेक्षित गृहसौख्य मिळणे कठीण होईल. विशेष करून मातृसुखात बाधा येणे संभवते. तसेच स्वत:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील वाद, भांडणे अशापैकी कारणानी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग संभवतात. श्रद्धा असेल तर मन:शक्तीसाठी कुलदैवताची उपासना करा.

**(६) कन्या -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल,
प्रगतिकारक, सुखदायक व लाभदायक होईल. विशेष करून बौद्धिक कार्यक्षेत्र, शिक्षणक्षेत्र, साहित्यिक, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना तसेच यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते अशा सर्वांनाच या संपूर्ण महिन्याचा काळ सुखकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या काहींना उत्तम नोकरी वा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते.

नोकरीत काहींना बढती, वेतनवाढ, तर काहीना एखादे मानाचे स्थान वा पद मिळणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे काहींना परदेशगमनाची संधी मिळेल तर काहींना आर्थिक लाभ होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे भावंडसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील, तर काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. काहींना फसवणूक झाल्याचा त्रास सहन करावा लागेल. भाग्य स्थानी असलेला शुक्र मनोनुकुल घटना घडवेल व त्यामुळे सुखशांती लाभेल. काहींना गुरुकृपा प्राप्त होणेही शक्य आहे. काहींना प्रसिद्धी मिळेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. मोबाईलवर वार्तालाप करीत वाहने चालवू नका. मित्रांशी भांडण होणे संभवते. त्यामुळे मैत्रीत बाधा येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना अनारोग्य, कसल्या तरी गोष्टीचा मोह अशापैकी कारणांनी मनापासून अध्ययन करणे जमणार नाही, असे वाटते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात अधिक प्रमाणात कौटुंबिक जीवनात आणि वैवाहिक जीवनात मनस्ताप देणाऱ्या घटनांशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. आर्थिक अडचणी, आर्थिक नुकसान होणे, कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा मनस्ताप सहन करावा लागणे, कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडणे, जे कर्जबाजारी असतील त्यांच्या कर्जात वाढ होणे,
जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त वागणे, पतिपत्नीत वाद, भांडणे होणे, भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत संशयाने वा गैरसमजाने बाधा निर्माण होणे अशा प्रकारच्या कारणांनी गृहसौख्यात व नोकरी-व्यवसायात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत काही तरी कारणाने अडथळे निर्माण होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अधिक प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मोठ्या अधिकारी मंडळींच्या ओळखी होतील. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. पण महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळींना वरिष्ठांकडून होणारी मानहानी सहन करावी लागेल. म्हणून महिन्याच्या पूर्वार्धात मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करा म्हणजे होणारा त्रास सुसह्य होईल. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. तसेच काहींना जुगार खेळण्याचा मोह होईल. त्याला लगाम घाला. अध्यात्मात मनापासून रस असेल तर त्यासाठी संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. अष्टम स्थानी असलेल्या शुक्रामुळे जन्मकुंडलीतील योगानुसार काही तरी लाभदायक घटना घडू शकेल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालू असून आपली राशी शनि ग्रहाच्या शत्रूची राशी असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटनाच घडणार आहेत ही गोष्ट ध्यानात घेऊनच या राशीच्या मंडळीनी मनावर ताबा ठेवून, सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल व गुरु-शुक्राच्या काही

प्रमाणातील अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद उपभोगू शकाल. शनि ग्रह शारीरिक-मानसिक अनारोग्यकारक होणार असून मनस्ताप देणाऱ्या घटना घडवून गहरे नैराश्य निर्माण करणारा असाच सिद्ध होईल. संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी घरगुती जीवनात व एकूण गृहसौख्यात बाधा निर्माण करीलसे दिसते. जपा. केतुमुळे घरीदारी कोणाशीच पटणार नाही. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला मंगळ ग्रह उष्णताविकारांनी त्रस्त करील. काही मंडळींना मूळव्याधीचा तर काहींना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना असह्य शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील. शिवाय अपघात भय असून हाडमोड होणेही संभवते. जपा. बाहेरचे उघडे पदार्थ खाऊ नका . विषभय आहे. जपा. काही मंडळींना अति विचारामुळे डोकेदुखीचा तर क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार त्रस्त करीलसे वाटते. काहींना जीवनसाथीच्या व मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. या राशीच्या नोकरदार मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ फारसा अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. केवळ बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. असह्य मनस्ताप होणे संभवते. शुक्रामुळे काहींना गुरुकृपा तर काहीना एखाद्या सुखकारक घटनेचा आनंद मिळेल. गुरु ग्रहामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. विवाहेच्छूचे विवाह ठरतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अतिशय भावनाशील झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. भावनेच्या भरात कोठेही भरकटत जाल. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून, सहनशील बनून सावधानतेने चालावे व सर्व आर्थिक व्यवहार जपून, फसवणूक होणार नाही याची काळजी घेऊन व कोणावरही फाजील विश्वास न ठेवता करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा असह्य त्रास सहन करावा लागेलसे दिसते. कुसंगतीपासून जपा. मनस्तापामुळेच शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे मन शांत व स्थिर राहू शकेल. गुरु-शुक्र शुभ योगामुळे महिन्यातील बराचसा काळ वृद्धी आणि कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळणेही शक्य आहे. काहींचा मानसन्मान होणेही संभवते. काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशवारीचे योग संभवतात. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थ लाभ होईल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थिती असल्याचाच अनुभव येईल . या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल ग्रह कलाविश्कारास पोषक आहे. तसेच संशोधन कार्यासही अनुकुल होईल. विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायातही गैरसमज, वाद, भांडणे यांमुळे बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** वर्तमान स्वभाव सतत तक्रारखोर असा झाला असेल तर या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या कोणाशीच पटवून घेणारी नसावी, असे वाटते. त्यामुळे काहीही मनोनुकुल असे घडले तरी त्याचे सुखसमाधान लाभत नसेल. त्याचप्रमाणे आहे त्या परिस्थितीत स्वस्थता लाभत नसेल

असे वाटते. तसेच घरातही चैन पडत नसेल. त्यात भर म्हणून आरोग्यविषयक समस्याही त्रस्त करत असण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना ताप येणे, उष्णतेने अंगावर फोड येणे, रक्तविकार, हृदयविकार असेल तर तो बळावणे, काहींना पोटविकाराचा आजार होणे अशापैकी एखाद्या आजाराचा त्रास होणे संभवते. त्याचप्रमाणे काहींना आर्थिक चिंता सतावत असेल तर काहींना चोरी होणे, आर्थिक नुकसान होणे अशापैकी घटना घडून मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. क्वचित कोणास अपप्रचाराचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना, सर्व प्रकारचा व्यापार-व्यवसाय असणाऱ्या मंडळींना, कलात्मक व बौद्धिक व्यवसाय असणारांना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांना काहीही कारणाने भागीदारीत मनस्ताप देणारा ठरण्याची शक्यता दिसते. तसेच काही कोर्ट प्रकरणे असतील तर त्यात यश येण्याची शक्यता दिसत नाही. जपा. दाम्पत्य जीवनात दोघांपैकी कोणाचे अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे , गैरसमज अशापैकी कारणांनी अपेक्षित सुखसमाधान मिळण्याची शक्यता दिसत नाही. जपा. शुक्र ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण शनीमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. गुरु ग्रह अध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल व त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची वर्तमान मनस्थिती अत्यंत कोमल झाली असल्यास मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. तसे असेल तर त्यांनी “शिवोपासना" करावी. “ओम नम: शिवाय “ मंत्राचा सतत जप करावा. त्यामुळे मन:शक्ती प्राप्त होईल. व्यवसाय स्थानी शत्रू राशीत असलेल्या शनि ग्रहामुळे विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्यता आहे. जपा. नोकरदार मंडळींना नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नाराजीशी मुकाबला करावा लागेल. त्यामुळे असह्य मनस्ताप झाल्यास शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात काही प्रमाणात परिस्थितीत सुधारणा होईल. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, औषध विक्रेते, यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना , लोखंडी सामान, कोळसा विक्रेते अशा सर्वांना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. कौटुंबिक व गृहसौख्य लाभेल; पण विविध कारणानी संततिसुखात बाधा येणे संभवते. राहूमुळे दाम्पत्य जीवनात स्वत:चे वा जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील गैरसमज , वाद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही मंडळींना अचानक धनलाभ किंवा वारसाहक्काने धनलाभ होणे

संभवते. शिवोपासनेबरोबरच श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे " हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींची वर्तमान मनस्थिती अत्यंत अस्थिर, लहरी, संतापी अशी झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे अविचाराने नको ते आचरण होणे संभवते. जपा. अकारण फटकळ बोलण्यामुळे प्रिय जनांची मने दुखावली जातील. तसे घडू नये म्हणून जिभेला लगाम घाला. सहनशील बना व नम्रतेचे आचरण करा. गुरु-शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह शुभ योगात असल्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अधिक प्रमाणात अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे नवे स्नेहसंबंध वा प्रेमसंबंध जुळून येतील. विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह ठरतील. काही मंडळींना धनलाभ होणे संभवते; तर काहींना प्रवासयोग संभवतो. स्वराशीतील शुक्र ग्रहामुळे महिन्याच्या पूर्वार्धात मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील. पण रवि-मंगळ हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे कौटुंबिक भांडण तंटे, वाद, गैरसमज , घडणाऱ्या असमाधानकारक घटना अशापैकी कारणानी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या तर काहींना स्थावरसंबंधी समस्या मनस्ताप देईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा होईल, व बरे वाटेल. महिन्याच्या उत्तरार्धात मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी संततिसमस्या मनस्ताप देतील. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणानी अडथळे, अडचणी येणे संभवते. नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण गुप्त पोलीस असणारांना काळ अनुकुल होईल. मन:शांतीसाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

=====ooooo0ooooo=====